MHST080007172026

**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४२/२०२६</u>**
**(लोणंद पोलीस स्टेशन गु.र.नं.३६९/२०२५)**

श्री. सुरज भागवत माने

–वि.–

महाराष्ट्र सरकार तर्फे लोणंद पोलीस स्टेशन

## <u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u>

अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ५०३ अन्वये दाखल केलेला आहे.

**<u>अर्जदाराचे थोडक्यात कथन पुढील प्रमाणे</u>** –

**<u>०२.</u>** लोणंद पोलीस स्टेशन यांनी गु.र.नं.३६९/२०२५ हा प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११, ११(१)(डी) अन्वये दाखल केलेला आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेले महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे टाटा पिकअप हे चारचाकी वाहन क्र.MH-23-6636, चेसीस नं.MA1ZP2GAAA1A13718, इंजिन नं.GAA1A10320 हे वाहन परत मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**<u>०३.</u>** अर्जदाराचे पुढे असे कथन आहे की, वर नमुद वाहन हे त्यांच्या मालकीचे आहे. सदर वाहन हे पोलीसांनी सदर गुन्हयात जप्त करुन पोलीस स्टेशनचे आवारात ठेवलेले आहे. सदर गुन्ह्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार आहे. अशा परिस्थितीत सदर वाहन उघडयावर पडून राहिल्यास त्याचे नुकसान होईल. सबब, अर्जदाराने सदर जप्त वाहन परत मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे.

**०४.** तपासी अधिकारी व विद्वान सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे मागविण्यात आले. तपासी अधिकारी यांनी त्यांचा जबाब निशाणी क्र.०५ वर दाखल केला असून त्यांनी सदर वाहन अर्जदारास परत करण्यास हरकत दर्शविलेली आहे. विद्वान सरकारी अभियोक्ता यांनी सदर अर्जावर त्यांचा जबाब दाखल केला असून त्यांनी देखील सदर वाहन अर्जदारास परत करण्यास तिव्र हरकत दर्शविलेली आहे.

**०५.** अर्जदार यांनी त्यांचे अर्जाचे पृष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र निशाणी क्र.२ लगत दाखल केले आहे. त्याचप्रमाणे अधिक पुराव्याकामी लोणंद पोलीस स्टेशन अंतर्गत गु.र.नं.३६९/२०२५ च्या एफ. आय. आर. ची प्रत, अर्जदाराच्या आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत व वाहनाच्या आर. सी. बुकची व्हेरिफाईड प्रत इत्यादी दस्तऐवज दाखल केले आहेत. अभिलेखावर दाखल जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अर्जदार सदर वाहनाचे नोंदणीकृत मालक आहेत. आजपावेतो अर्जदाराव्यतिरिक्त सदर जप्त वाहनाचा ताबा कोणीही मागितलेला नाही. त्यामुळे अर्जदार जप्त वाहनाचा ताबा मिळण्यास पात्र आहेत. प्रस्तुत गुन्हयाचा खटला पूर्ण होणेस बराच अवधी लागणार आहे. तोपर्यंत सदर वाहन पोलीस स्टेशनचे आवारात उभे ठेवल्यास त्याचे नुकसान होण्याची तसेच त्याचे किंमतीत घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत, अर्जदारास जप्त वाहन अटी व शर्तीवर परत देणे योग्य होईल. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. लोणंद पोलीस स्टेशन यांनी गु.र.नं.३६९/२०२५ मध्ये जप्त केलेले महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनीचे टाटा पिकअप हे चारचाकी वाहन क्र.MH-23-6636, चेसीस नं.MA1ZP2GAAA1A13718, इंजिन नं.GAA1A10320 हे वाहन अर्जदार सुरज भागवत माने

यांचे असल्याबाबत कागदपत्रांची शहानिशा केल्यानंतर त्यांना खालील अटींवर परत करण्यात यावे.

अ. अर्जदार यांनी वरील नमुद वाहन यात कोणत्याही प्रकारचा बदल करु नये.

ब. अर्जदार यांनी सदर वाहनासंदर्भात त्रयस्त इसमाचे हक्क, हितसंबंध निर्माण करु नये अथवा सदर वाहन कोणालाही विक्री करु नये आणि कोणाकडे गहाण ठेवू नये.

क. अर्जदार यांनी न्यायालयात रक्कम रुपये ३,५०,०००/– चे बंधपत्र (बॉन्ड) भरुन दयावे.

ड. अर्जदार यांनी सदर वाहनाचा वापर कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यामध्ये करु नये.

इ. न्यायालय आदेश करेल त्यावेळेस अर्जदार यांनी सदर वाहन न्यायालयात हजर करावे.

फ. तपासी अमंलदार यांनी सदर वाहन अर्जदारास परत करतांना त्याचा सविस्तर पंचनामा करुन मुददेमालाचा एक रंगीत फोटो काढून न्यायालयाच्या अवलोकनासाठी दाखल करावा.

३. सदरचा अर्ज, त्यावरील आदेश व अर्जातील संपुर्ण कागदपत्रे ही लोणंद पोलीस स्टेशन यांनी गु.र.नं.३६९/२०२५ च्या कागदपत्रांत अथवा या गुन्ह्यात दोषारोपपत्र दाखल झाल्यास त्या प्रकरणासोबत ठेवावे. सदर आदेशाबाबत तपासी अधिकारी यांना कळविण्यात यावे.

SHRUTI GIRISH KUVALEKAR
Digitally signed by SHRUTI GIRISH KUVALEKAR
Date: 2026.06.04 15:46:10 +0530

दिनांकः ०४.०६.२०२६ (श्रीमती. एस. जी. कुवळेकर)
ठिकाणः खंडाळा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खंडाळा.